← APRATIM 27 July. 2019

# रामानंदनगर महाविद्यालयात कारगील विजय दिवस साजरा

**रामानंदनगर (वार्ताहर)**

१९९९साली भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये लढल्या गेलेल्या कारगिल युद्धाला चालू वर्षी २० वर्ष पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्टस, सायन्स एड कॉमर्स कॉलेजमध्ये 'कारगील विजय दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयामध्ये अशोक बळवंत खोत यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी ते म्हणाले, "सुमारे साडे तीन महिने चाललेले कारगिल युद्ध वीस वर्षापूर्वी आजच्याच दिवशी अधिकृतरित्या संपल्याची घोषणा करण्यात आली होती. अती उंच भागावर झालेल्या युद्धाची युद्धनिती कशी असावी याचा आदर्श भारताने आंतराष्ट्रीय स्तरावर घालून दिला. जगाकडून भारताचे यासाठी कौतुक करण्यात आले."

महाविद्यालयातील एन.सी.सी. छात्रसैनिकांनी रामानंदनगर गावातून कारगिल विजय दिनानिमित्त घोषणा देत फेरी काढण्यात आली. तसेच महाविद्यालयांमध्ये चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार महाविद्यालयातील तरुणांना 'उरी' हा चित्रपट मोफत दाखवण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. एल.डी. कदम, एन.सी.सी. समन्वयक प्रा. एस. ए. भंडारे, उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. पाटील व उपप्राचार्य काकासाहेब भोसले, प्रा. एन. एच. कुंभार, श्री. सुहास सौंदाडे आदी सेवकवृंद उपस्थित होते.

:om/epaper-online.aspx

दै.ललकार

# रामानंदनगर महाविद्यालयात कारगील विजय दिवस साजरा

रामानंदनगर दि. २६ (वार्ताहर)- १९९९साली भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये लढल्या गेलेल्या कारगिल युद्धाला चालू वर्षी २० वर्ष पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्टस, सायन्स एड कॉमर्स कॉलेजमध्ये 'कारगील विजय दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयामध्ये अशोक बळवंत खोत यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी ते म्हणाले, ''सुमारे साडे तीन महिने चाललेले कारगिल युद्ध वीस



वर्षापूर्वी आजच्याच दिवशी अधिकृतरित्या संपल्याची घोषणा करण्यात आली होती. अती उंच भागावर झालेल्या युद्धाची युद्धनिती कशी असावी याचा आदर्श भारताने आंतराष्ट्रीय स्तरावर घालून दिला. जगाकडून भारताचे यासाठी कौतुक करण्यात आले.''

महाविद्यालयातील एन.सी.सी. छात्रसैनिकांनी रामानंदनगर गावातून कारगिल विजय दिनानिमित्त घोषणा देत फेरी काढण्यात आली. तसेच महाविद्यालयामध्ये चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार महाविद्यालयातील तरुणांना 'उरी' हा चित्रपट मोफत दाखवण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. एल.डी. कदम, एन.सी.सी. समन्वयक प्रा. एस. ए. भंडारे, उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. पाटील व उपप्राचार्य काकासाहेब भोसले, प्रा. एन. एच. कुंभार, श्री. सुहास सौंदाडे आदी सेवकवृंद उपस्थित होते.